आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in






# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.:- MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक २२१ वा ● रविवार दि. ०२ फेब्रुवारी २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●







## झरोका

एक – प्रधानमंत्री नरेंद्र मोदी संविधानाशिवाय भारताला पर्याय नाही, त्यातच सर्व काही यश दडलेले असे म्हणतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मोहन भागवत हे भारताच्या राष्ट्रध्वजात धम्मचक्र असे ठणकावून सांगतात, तर भारताचे गृहमंत्री अमित शहा हे कुटुंबीयांसह कुंभमेळ्यात संगम स्नान करतात ही काय नौटंकी आहे हेच कळत नाही, डोकं बधिर झाले.

दुसरा – अरे, हिंदुत्ववादी लोक असेच वागतात, तसेच बोलतात, करतात. एकीकडे लोकशाही संविधानाचा गाजावाजा करायचा आणि दुसरीकडे जातीवाद, धर्मवाद जोपासयचा, त्यातलाच मोदी, भागवत यांचा प्रकार असून, अमित शहा यांनी तर पत्नी, मुला, मुलीसह एकत्रित अर्ध लग्न संगम प्रीती स्नान, यावरून सत्तेच्या माझा भारताला कोठे घेऊन जात आहेत, ते भागवत, मोदी, शहा हे लक्षात येईल, कशाला बडबड करतो आहेस.

एक – अहो, बडबड कसली देश पातळीवर मंत्री शहा यांचा निषेध केला पाहिजे, भागवत, मोदींना जॉब विचारला पाहिजे, अन्यथा लोकशाहीच्या नावाखाली हुकूमशाही एकाधिकारशाही बरोबर कुंभमेळा संगमी स्नान शाही पण लागू करण्यास हे ते तिरकस मागे पुढे पाहणार नाहीत म्हणून बोलतोय.

दुसरा – अरे, दीड शहाण्या भलतेच बोलतो आहेस. लोकसभा निवडणुकीत काय अनेक महिला, पुरुषांचे डोके कुठे घाण ठेवले होते. दहा वर्षातील अनुभव कमी होते का? उद्याला गाव, गाव नदी नाले, तलाव निर्माण करा, त्यात सारे जण कुटुंबीयास नागडे व्हा, म्हणजेच लोकशाही अवतरेल आणि भागवत, मोदी, शहा यांची जपमाळा सुरू होईल, एवढेच शिल्लक आहे, समजलं.

## काय बोलता राव ?

ठाकरे सरकारमध्ये पालकमंत्री अमित देशमुख होते, परंतु शिंदे सरकारवर मध्ये कॅबिनेट मंत्री संजय बनसोडे असताना–ही गिरीश महाजनांना लातूरचे पालकमंत्री बनवून लातूरकरांच्या मानगुटीवर बसविले गेले, आता देवेंद्र फडणीस सरकारने लातूरचे बाबासाहेब पाटील कॅबिनेट मंत्री असताना–ही, छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज शिवेंद्रसिंह राजे भोसले यांना पालकमंत्री म्हणून लातूरकरांच्या भल्यासाठी नियुक्ती केली, लातूरचा विकास डोळे भरून पाह–ताना, डोळे चांगले होतील की काय असे वाटते आहे.

**काय बोलता राव !**

अरे, मागील काळात अमित देशमुख कॅबिनेट तर संजय बनसोडे हे राज्यमंत्री होते हेवे दाव्यात जिल्ह्याचा विकास रखडला पण बनसोडे यांनी उदगीर जळकोट वर नजर ठेवले पुन्हा संजय बनसोडे कॅबिनेट असताना निलंगेकर देशमुख यांनी स्वार्थी बनसोडे यांना पालकमंत्री होऊ दिले नाही, परंतु आज घडीला मराठा शाळेचे बाबासाहेब पाटील कॅबिनेट मंत्री असतानाही देशमुख, निलंगेकर यांनी तुलां मला, नाही तर कोणाला ही नाही, उद्देशानेच पाटील यांना डावलून राजे भोसले यांना पालकमंत्री म्हणून स्वीकारलेले असावे अशीच आनंदमय चर्चा होताना, राजा हा राजाच असतात, शिवेंदसिंह राजे भोसले यांनी सिध्द करुन दाखवले चित्र दिसते आहे.




## शिक्षण क्षेत्रात डिजिटल आणि –ख चा समावेश: विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी क्रांतिकारी अर्थसंकल्प – उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील

मुंबइ: प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी या अर्थसंकल्पात शिक्षणाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन देशातील शेतकरी, नोकरदारवर्ग,कष्टकरी, व्यापारी, उद्योजक, महिला, युवक, विद्यार्थी, सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून सादर केलेल्या अर्थसंकल्पातून देशातल्या प्रत्येक व्यक्तीला विकासाची संधी, प्रत्येक समाज घटकाला बळ आणि विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी –ख सारख्या नवीन तंत्रज्ञानाची जोड देऊन देशाला आर्थिक महासत्ता आणि विकसित राष्ट्र बनण्याच्या वाटेवर नेणारा हा अर्थसंकल्प मांडला, अशी प्रतिक्रिया उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटीलयांनी दिली.



या अर्थसंकल्पात शिक्षण क्षेत्रासाठी १.२८ लाख करोड रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये ५०,०६७ करोड रुपये केवळ उच्च शिक्षणासाठी तरतूद करण्यात आली आहे.

मेडिकलच्या एका वर्षात १० हजार आणि पुढील ५ वर्षात ७५ हजार जागा वाढवण्यात येणार आहेत. उच्च शिक्षण विभागामध्ये डिजिटल संसाधनांची सुरुवात करण्यासाठी ' भारतीय भाषा पुस्तक ' ही योजना राबविण्यात येणार आहे. उच्च शिक्षण संस्थांना भारतीय भाषेतील पुस्तकांची डिजिटल आवृत्ती प्रदान करणे हे या योजनेचे वैशिष्ट्य आहे.

याशिवाय आयआयटी पाटणा चा विस्तार आणि ५ नवीन आयआयटी मध्ये अतिरिक्त पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर देण्यात आला आहे. आयआयटीचे आणखी ६ हजार ५०० जागा वाढवण्यात येणार आहेत. संशोधनासाठी १० हजार फेलोशिप दिल्या जाणार आहेत तसेच विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन वाढवण्यासाठी अटल टिंकरिंग लॅब्सचा स्थापना करून पुढील ५ वर्षात ५०, हजार लॅब्सची स्थापना करण्यात येणार आहे. या अर्थसंकलपात कृत्रिम बुद्धिमत्ता (–ख) संदर्भात देशभरात तीन कृत्रिम बुद्धिमत्ता केंद्र स्थापित करण्याची घोषणा केली आहे. या केंद्रांचे उद्दीष्ट –ख तंत्रज्ञानाच्या विकासासाठी एक ठोस पायाभूत सुविधा तयार करणे आणि उद्योगांसाठी महत्त्वपूर्ण संशोधन करणे आहे. देशात –ख तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रगतीसाठी एक मजबूत पाया तयार केला आहे, ज्यामुळे उद्योग आणि अर्थव्यवस्था अधिक डिजिटल आणि तंत्रज्ञानावर आधारित होईल.असेही उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

## अमृतकाळात भारताला आर्थिक सुबत्ता देणारा आणि पर्यायी इकोसिस्टीम निर्माण करणारा अर्थसंकल्प

**नागपूर, : गरीब, युवक, शेतकरी, महिला या चार घटकांना समर्पित आणि शेती विकास आणि उत्पादकता, ग्रामीण समृद्धी आणि शाश्र्वतता, रोजगार आधारित विकास, मनुष्यबळ तयार करणे, नाविन्यपूर्ण गुंतवणूक, ऊर्जेची उपलब्धता आदी १० क्षेत्रांना व्यापत अमृतकाळात भारताला सुबत्ता देणारा आणि पर्यायी इकोसिस्टीम तयार करणारा केंद्रीय अर्थसंकल्प आहे. राज्यांसाठीही यात महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या असून याचा लाभ घेत महाराष्ट्रही विकसित भारत देशाच्या घोडदौडीत अग्रेसर होईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केले.**




मनी बी इन्स्टिट्यूटच्यावतीने येथील लक्ष्मीनगर परिसरातील सायंटिफिक सोसायटीच्या लॉनवर आयोजित 'अमृतकाळ विकसित भारत –२०४७ परिषदे' चे उद्घाटन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते झाले. संसदेत आज सादर झालेल्या वर्ष २०२५–२६ च्या अर्थसंकल्पाचे विश्र्लेषण करतांना ते बोलत होते. केडिया सिक्युरिटीजचे व्यवस्थापकीय संचालक विजय केडिया आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे मुख्य व्यवसाय विकास व्यवस्थापक श्रीराम कृष्णन आणि मनी बी संस्थेच्या संचालक शिवानी दाणी– वखरे यावेळी उपस्थित होत्या.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, शेतीची उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने बियाणे, सिंचनाच्या सोयी, वीजेची उपलब्धता आदी एकात्मिक कार्यक्रम देशातील १०० जिल्ह्यांमध्ये राबविण्याची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली असून याद्वारे १ कोटी पेक्षा जास्त शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. डाळी, तेलबियांचे उत्पादन वाढवून देशाला स्वयंपूर्ण बनविण्यासाठी सहा वर्षांचा विशेष कार्यक्रम आखण्यात आला आहे. देशातील कापसाचे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने येत्या पाच वर्षासाठी कापूस मिशन हाती घेण्यात आले आहे. विदर्भ, मराठवाड्यासह राज्यातील कपाशी पिकाखालील ५० लाख हेक्टर क्षेत्रावर घेण्यात येणाऱ्या कपाशी पिकाच्या उत्पादन वाढीसाठी याचा लाभ होईल. किसान केड्रीट कार्डची मर्यादा ३ लाखांवरुन ५ लाखांपर्यंत वाढविण्यात आल्याने शेतकऱ्यांना बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन देणे आदी महत्वाच्या तरतूदी अर्थसंकल्पात असल्याचे त्यांनी सांगितले.

सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योग क्षेत्राचा भारताच्या एकूण उत्पादन क्षेत्रात ३६ टक्के वाटा आहे. यावर लक्ष केंद्रीत करुन अर्थसंकल्पात या क्षेत्रात उत्पादन वाढ व रोजगार निर्मितीसाठी १.५लाख कोटींच्या योजना आणल्या आहेत. भारतीय तंत्रज्ञान संस्थांमध्ये (आयआयटी) विद्यार्थी क्षमता वाढविण्यासह वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात (एमबीबीएस) १० हजार जागा वाढविण्यात येणार आहे. देशात सरकारी रुग्णालयांमध्ये २०० कर्करोग केंद्र स्थापित करण्यात येणार आहे. भगवान गौतम बुद्धांशी संबंधित स्थळांच्या विकासासह देशात ५० आंतरराष्ट्रीय दर्जाचे केंद्र उभारण्यात येणार असून त्यासाठी राज्यांमध्ये स्पर्धा घेण्यात येणार आहे.

मध्यम वर्गाला केंद्रस्थानी ठेवून देशाच्या अर्थसंकल्पाच्या इतिहासात प्रथमच आयकर मर्यादा १२ लाखांपर्यंत वाढविण्यात आली आहे. यामुळे मध्यम वर्गीयांची क्रयशक्ती वाढेल व त्याने रोजगार निर्मिती, उत्पादनालाही चालना मिळेल. देशातील आयकर व्यवस्था अधिक सुटसुटीत करण्यासाठी नवीन आयकर कायदा आणण्याची घोषणाही आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी केली आहे. यातून देशात सकारात्मक परिवर्तन घडेल, असा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला.

## भोकरला टेनिस बॉल क्रिकेट आमदार चषकाचे आयोजन

भोकर – भोकर येथे मा. उपनगराध्यक्ष शेख युसूफभाई व ड.विशाल दंडवे मित्र मंडळाच्या वतीने येत्या चार ते नऊ फेब्रुवारी दरम्यान आमदार चषकाचे आयोजन करण्यात आले असून या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत महाराष्ट्रातून एकुण १६ आमंत्रित संघ सहभागी होणार आहेत.



मा.उपनगराध्यक्ष शेख युसूफ यांच्यावतीने १ लाख २१ हजार १११ रूपयांचे स्पर्धेचे पहिले बक्षीस देण्यात येणार आहे.

अशी माहिती स्पर्धेच्या आयोजकांकडून देण्यात आली.भोकर शहरातील किनवट रोडवरील हनुमान मंदिराच्या मैदानावर आयोजित या स्पर्धेचे ४ फेब्रुवारी रोजी उद्घाटन आमदार श्रीजया अशोक चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी मा. आ.अमर राजुरकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.तर ९ फेब्रुवारी रोजी बक्षीस वितरण सोहळा माजी मुख्यमंत्री तथा खा.अशोक चव्हाण यांच्या हस्ते पार पडणार आहे.या स्पर्धेसाठी माजी उपनगराध्यक्ष शेख युसूफभाई यांच्याकडून पहिले बक्षीस १ लाख २१ हजार १११ रूपयांचे, ७७,७७७ रुपयांचे दुसरे बक्षीस दिलीप सोनवडे यांच्याकडून, ५५,५५५ रुपयांचे तृतीय बक्षीस पंकज पोकलवार यांच्याकडून तर तृतीय बक्षीस ३३,३३३ रुपयाचे ठेवण्यात आले आहे.यासह मॅन ऑफ द सिरीज, बेस्ट बॉलर, बेस्ट बॅट्समन, मॅन ऑफ द मॅच, बेस्ट कीपर, बेस्ट बॉलर ,बेस्ट कॅच घेणाऱ्यासाठीही बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

ही स्पर्धा यशस्वी व्हावी यासाठी ड.विशाल दंडवे,श्रीनिवास सोनवाडे ,अनिल बेरदेवाड ,माधव श्रीखंडे मन्मथ शेटे, सुधाकर माचनवर, योगेश कदम, मनोज कदम, विपीन पवनकर,प्रशांत आडे,शेख नदीम, सुनिल कदम,शेख अखिब,अनिल बेरदेवाड,सचिन वडगावकर,विशाल राठोड,असलम पटेल,अनिल जाधव,वरूण आडे,असलम शेख,विजय सुरेशकर यांच्यासह अनेक जण परिश्रम घेत आहेत.

## बियाणे, खतांवरील शेतकऱ्यांचा खर्च कमी करण्यासाठी शेताच्या बांधावर जैविक प्रयोगशाळा उभारणी व्हावी- निलेश हेलोंडे पाटील

लातूर (जिमाका) : बियाणे आणि गायरान जमिनींवर चारा लागवड करण्यासाठी




रासायनिक खतांवर मोठ्या प्रमाणात होणाऱ्या खर्चामुळे शेतकऱ्यांच्या हाती काही लागत नाही. त्यामुळे त्याची आर्थिक परिस्थिती बिकट बनते. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवायचे असेल तर त्यांचा बियाणे, खतांवरील खर्च कमी करणे आवश्यक आहे. यासाठी कृषि विभागाने शेताच्या बांधावर जैविक प्रयोगशाळा उभारणीचे प्रशिक्षण शेतकऱ्यांना देवून त्यांना घरीच बीज प्रक्रिया, जैविक खते, कीड नियंत्रक सापळे निर्मितीचे प्रशिक्षण द्यावे, अशा सूचना कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड. निलेश हेलोंडे पाटील यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात शुक्रवारी आयोजित विविध शासकीय विभागांच्या आढावा सभेत ड. हेलोंडे पाटील बोलत होते. निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, आत्माचे प्रकल्प संचालक शिवसांब लाडके, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था संगमेश्र्वर बदनाळे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे, जिल्हा कौशल्य विकास सहायक आयुक्त बालाजी मरे, कृषी उपसंचालक महेश क्षीरसागर, जिल्हा रेशीम विकास अधिकारी एस. बी. वराट यावेळी उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी दुग्ध व्यवसायाला प्रोत्साहन देण्याची गरज आहे. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात उन्हाळ्यात पुरेसा चारा उपलब्ध होत नसल्याने पशुपालकांना अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे ७ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्ह्यातील कृषी, पशुसंवर्धन विभागाने पुढाकार घ्यावा. पहिल्या टप्प्यात प्रत्येक तालुक्यातील किमान ५ एकर गायरान जमिनीवर चारा लागवड करावी. टेकडी, डोंगराळ भागातही चारा लागवडीसाठी प्रयत्न करावेत, असे ड. हेलोंडे पाटील यांनी सांगितले.

शेतकरी जगाचा पोशिंदा आहे आहे, त्याच्यासाठी राबविण्यात येत असलेल्या शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. या योजनांची माहिती शेतकऱ्यांना मिळावी, यासाठी कृषी विभागाने जनजागृती करावी, असे ड. हेलोंडे पाटील म्हणाले. तसेच शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग नसल्याने शेतकऱ्यांना आपला शेतमाल कमी दरात विकावा लागतो. त्यामुळे कृषी विभाग आणि जिल्हा उद्योग केंद्राने शेतमालावर प्रक्रिया करणारे छोटे–छोटे उद्योग जिल्ह्यात उभा राहण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

प्रत्येक कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये दर्शनी भागात शेतमालाच्या किमान आधारभूत किंमतीचे फलक लावणे आवश्यक आहे. तसेच शेतमाल तारण योजनेची माहिती शेतकऱ्यांना द्यावी. ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाची सोय, स्पर्धा परीक्षा वाचनालय व शाळेत पटांगणाची सुविधा असणे आवश्यक आहे, असेही ड. हेलोंडे पाटील यांनी सांगितले. कृषि विभागाने कौशल्य विकास विभाग व पशुसंवर्धन विभागाच्या मदतीने शेतकरी युवकांना रोजगार उपलब्ध होतील यासाठी प्रयत्न करावेत, असे त्यांनी सांगितले.

## विज्ञान प्रदर्शनीतील बक्षिसाची रक्कम वाढविणार – राज्यमंत्री पंकज भोयर

अमरावती : बालवैज्ञानिक विज्ञान प्रदर्शनीच्या माध्यमातून संशोधन आणि प्रगतशीलता दिसून येते. या बालवैज्ञानिकांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रदर्शनीमधील सर्वोत्कृष्ट उपक्रमांना देण्यात येणारी रक्कम वाढविण्यात येणार आहे, अशी माहिती शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिली.

शिवाजी शिक्षण संस्थेच्या प्रांगणात आयोजित राज्यस्तरीय बालवैज्ञानिक विज्ञान प्रदर्शनीचा समारोप आज करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य मिलिंद कुबडे, राज्य विज्ञान परिषदेच्या संचालक डॉ. हर्षलता बुरांडे, राज्य विज्ञान संस्थेचे प्रा. प्रवीण राठोड, शिक्षण उपसंचालक निलिमा टाके, शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख, जयश्री राऊत, संस्थेचे उपाध्यक्ष जयंत पाटील पुसदेकर, दिलीप इंगोले, प्राचार्य डॉ. गजानन कोरपे आदी उपस्थित होते.



राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले, विद्यार्थ्यांना संशोधनाकडे वळवण्यासाठी विज्ञान प्रदर्शनी हे महत्त्वपूर्ण व्यासपीठ आहे. या ठिकाणावरून असंख्य वैज्ञानिक दृष्टिकोन असलेली व्यक्तिमत्व घडली आहे. हे परिषदेचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यामुळे या प्रदर्शनीला विशेष महत्त्व आहे. राज्य वैज्ञानिक दृष्टिकोनासाठी अग्रस्थानी आहे. संशोधन आणि प्रगतिशीलतेतून नवे शोध समोर येतील. हे नवे शोध समस्या निराकरणासाठी उपयोगी पडतील. तसेच यातून महत्त्वाचे तंत्रज्ञान पुढे येईल.आपला देश तरुणांचा देश आहे. या प्रदर्शनीमधील नवीन संकल्पना बौद्धिकतेला चालना देतील. यातून विकसित असे उपक्रम राबविण्यात येतील. यासाठी समाजातील प्रत्येक वर्गाला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. भविष्यातील वैज्ञानिक घडविण्यासाठी संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी पंकज नागपुरे यांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. कोरपे यांनी प्रास्ताविक केले. प्रवीण राठोड यांनी अहवाल वाचन केले. सहभागी विद्यार्थ्यांमधून प्रसाद जाधव, युवराज कृष्णकुबेर आणि मनीषा गुप्ता यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी सूनयंशी घोंगडे यांना चॅम्पीयन ट्रॉफी देवून गौरविण्यात आले. तसेच रेहान दारव्हणकर, जोसेफ, संस्कार देशमुख, पुष्पा वाकचौरे, पुनम कावर, गायत्री धुरी, संतोष देशमाने, गणेश बदकल यांनी प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दल गौरविण्यात आले.


आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# मोहन भागवत बोलतात पण !

संपादकीय...

नावात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ असले तरी त्या संघाचे रुपडे आणि अंतर्गत आतडे, वस्त्र, अस्त्र हे सारेच हिंदुत्ववादी मनुस्मृतिवादी, जातीयवादी भेदभाव करणारे असे असताना, एखाद राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंचालक मोहन भागवत यांनी महाराष्ट्रातील भिवंडी येथील एका कार्यक्रमात एक दोघांमुळे राष्ट्र मोठे होत नाही, त्यासाठी सामुदायिक प्रयत्न करायला हवेत असे स्पष्ट करून प्रजासत्ताक दिनी ध्वजवंदन रोहन प्रसंगी आपल्या राष्ट्रध्वजाच्या केंद्रस्थानी धम्मचक्र आहे, तो स्वतंत्र, समानता, बंधुभाव, समरसतेचा संदेश देतो असे म्हणाले पण सामाजिक न्याय बाजूला ठेऊ समरसता मध्येच घुसळून डॉ. मोहन भागवतांना काय सांगायचे होते याबद्दल तर्कवितर्क लढविले जात आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मोहन भागवत यांनी प्रजासत्ताक दिन कार्यक्रमात धम्मचक्र चा उल्लेख केला, संविधानातील हेतूचा उल्लेख केला, पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या समरस्यतेचा शब्द मध्येच आणून त्यांना काय बोलायचे ते बोललेच नाहीत, अर्थात मुंह मे राम, बगल मे सुरी, अर्थात राम या शब्दाला उलटेकडून मरा असेच डॉ. मोहन भागवत यांना स्पष्ट करायचे असेल की काय अशीच प्रतिक्रिया सर्वसामान्य जनतेतून व्यक्त होताना दिसते आहे.

हिंदुत्व, मनुस्मृति ग्रंथ यातील संदेश, दोष काय आहेत, असावेत याबाबतीत तर्कवितर्क लक्ष्मण शास्त्री जोशी यांनी भारतीय बौद्ध धर्माचे वर्चस्व निर्माण झाल्यानंतरच ब्राह्मणाच्या सामाजिक वर्चस्वाला उत्तरती कळा लागली त्या काळात सामाजिक ब्राह्मणे, महात्मे, अधोरेखित करण्यासाठी त्यांचे पुनरुजीवन व सक्षमी करण्यासाठी मनुस्मृती हा ग्रंथ लिहिला गेला तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व साक्षीने मनुस्मृतीचे दहन केले हे कारण असे की मनुस्मृतीत वर्ण, श्रम, जाती व्यवस्था, ब्राह्मण वर्चस्व, उच्च, नीच्छता वर्ण, वर्ग भेद, कर्णभेद स्त्री, पुरुष भेद वगैरे अनिष्ट प्रथा, परंपराचा उद्घोष असल्याने मनुस्मृति जाळणे लाक्षणिक अर्थाने योग्य आहे असे तर तीर्थाने म्हटले असतानाही आज घडीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंचालक डॉ. मोहन भागवत हे स्वातंत्र्य, समानता, बंधुभाव बरोबर समरसता घोषविताात पण सामाजिक न्यायाला बाजूला कशासाठी काय म्हणून ठेवतात, हाच प्रश्न सामाजिक राजकीय वर्तुळासह प्रसार माध्यमातून चर्चेला जातो आहे त्याचे आकलन डॉ. मोहन भागवत करतील का, अशी ही लोक भावना व्यक्त होताना दिसते आहे.

मनुस्मृतीवर पहिला हल्ला महात्मा फुले यांनी केला होता. त्यानंतर २५ डिसेंबर १९२७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृतीचे दहन केले होते. त्यामुळे मनुस्मृतीची झालेली राख घेऊन खुद्द तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी हे बाबासाहेबांना भेटायला गेले आणि चर्चा केली तो क्षण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मोहन भागवत यांना माहीत असेल किंवा वाचण्यात आला नसेल पण राष्ट्र हे एक दोघा मुळे मोठे होत नाही, एवढी अक्कल असताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हाती हिंदुत्वाचे कोलीत देऊन राष्ट्रध्वजातील धम्मचक्रचे त्यातील उद्देश, हेतू, धोरणाचे, हिंदुत्व रूपांतर कसे करू पाहतात. तो अधिकार एक दोघाचा किंवा तिघांचा नसतोच तो सामुदायिक असायला हवा हे संघाच्या खोपडीत बसून पुढे या म्हणजे झाले एवढेच.

## 'सब का विकास' धोरणाला फाटा देणारा अर्थसंकल्प - माजी आमदार धिरज देशमुख



लातुर –सब का साथ सब का विकास, हे सरकारचे धोरण आहे. पण प्रत्यक्षात सरकार सर्वांच्या विकासावर बोलत नाही. आजचा अर्थसंकल्पही त्याच पद्धतीचा होता. मुठभरांचाच विकास साधण्यावर सरकारचा कायम भर राहिला आहे. त्यामुळे महागाई कमी होताना दिसत नाही. पेट्रोल डिझेलचे दर गगनाला भिडले आहेत. घरगुती गॅसचे भाव वाढतच आहेत. सर्वसामान्यांचे जगणे अवघड होत आहे. याकडे सरकारचे लक्ष नाही. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव नाही. शेतकऱ्यांना कर्जमाफी जाहीर करू, अशी घोषणा भाजपाने केली होती. अद्याप ही घोषणा पूर्ण केली नाही. महागाईला आळा घालण्यात सरकार अपयशी ठरत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांसाठी यंदाचा अर्थसंकल्प निराशादायक, अपेक्षाभंग करणारा असाच आहे.

## तुळजाभवानी शैक्षणिक संकुलाचे उद्या वार्षिक स्नेहसंमेलन

लातूर,–अंबिका बहुउद्देशीय महिला मंडळ, रोहिणा संचलित येथील संत ज्ञानेश्वरनगरातील तुळजाभवानी शैक्षणिक संकुलाच्या उडान–२०२५ या वार्षिक स्नेहसंमेलनाचे दि. ३ फेब्रुवारी रोजी मार्केट यार्डातील दगडोजीराव (दादा) देशमुख सभागृहात आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन छत्रपती संभाजीनगर शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते दुपारी ३ वाजता होणार आहे. अध्यक्षस्थानी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार सौदागर तांदळे यांची तर तुळजाभवानी शैक्षणिक संकुलाच्या सचिव के. ए. जायेभाये, राजमाता जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

यावेळी आमदार विक्रम काळे यांना शिक्षण क्षेत्रातील विशेष सेवा योगदान व उपक्रमशीलता मराठवाडा भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. उपस्थित राहावे, असे आवाहन तुळजाभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य जी. आर. मुंडे, तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांनी केले आहे.

## संशोधनाची छोटी संकल्पना विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण परिणाम साधते - प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे

लातूर : एक छोटी संकल्पना



प्रत्यक्षात आणल्यानंतर त्याचे परिणाम सकारात्मक स्वरूपात दिसून येतात.याच संकल्पनेतून शास्त्रज्ञांनी केलेल्या संशोधनाचा लाभ विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण ठरतो.संशोधन क्षेत्रासोबतच इतर क्षेत्रात देखील विद्यार्थ्यांना नावलौकिक मिळविता येतो.भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्ली येथे झालेल्या संचलनात महाविद्यालयातील तीन विद्यार्थ्यांनी कोळी नृत्य सादर करून महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले, तसेच प्रतिनिधित्व करावे,असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांनी केले.

जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने दि.३० जानेवारी २०२५ रोजी मॅक्स थेलर यांची १२५ वी जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे आणि डॉ.कोमल गोमारे यांनी वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली.जैवतंत्रज्ञान विभागातील प्रा.सुभद्र परगे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली.यावेळी बी.एस्सी.जैवतंत्रज्ञान प्रथम वर्षातील विद्यार्थिनी साठे रुपाली हिने मॅक्स थेलर यांच्या कार्याची माहिती उपस्थितांसमोर सादर केली.कार्यक्रमात जैवतंत्रज्ञान विभागातील प्रा.श्र्वेता मदने,डॉ.फिरदौस बिरादार,प्रा.अवंती बिडकर,तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी विशाल टार्फे,लक्ष्मण शिंदे,अशोक मदने,अश्र्विनी ढवारे आणि जैवतंत्रज्ञान विभागातील पदवी व पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी उपस्थित होते.

## वीरशैव तेली समाजाच्यावतीने हळदी - कुंकू कार्यक्रम संपन्न

लातूर :– दरवर्षी प्रमाणे याही वर्षी वीरशैव तेली समाज महिला मंडळ आयोजित मकर–संक्रांती निमित्त हळदी कुंकू समारंभ वीरशैव सांस्कृतिक भवन येथे असंख्य महिलांच्या उपस्थितीत भव्य दिव्य पार पडला. हळदी कुंकू संमारंभाचे उद्घाटन भाजपा नेत्या डॉ.सौ. अर्चनताई पाटील चाकुरकर यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून सौ.उषा फेसगाळे,सौ. माया कलशेट्टी,सौ. मिनाक्षी राऊत,सौ.माहेश्र्वरी क्षीरसागर,सौ.शशिकला हारनाळे,सौ. मनीषा भुजबळ,सौ.प्राजक्ता लोखंडे,सौ. संगीता उदगिरे,सौ.महादेवी क्षीरसागर, ग्रीन लातूर वृक्ष प्रतिनिधि सौ. दिपाली राजपूत,सौ. आशा आयचीत हे उपस्थित होते.




या सर्व मान्यवर महिलांचे स्वागत हळदी कुंकू महिला समिती प्रमुख सौ.वनिता व्यवहारे व महिला समिती सदस्य यांनी केले .कार्यक्रमाची सुरूवात कु. अंजली चोपडे व मंजिरी चोपडे यांच्या स्वागत गीताने व महात्मा बसवेश्र्वरच्या आणि सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून झाली. या प्रसंगी ग्रीन लातूर वृक्ष टीम तर्फे सौ. दीपाली राजपूत यांनी वृक्ष लागवडीचे महत्व उपस्थित महिलांना सांगून ग्रीन लातूर वृक्ष टीम तर्फे सर्व महिलांना ५०० फुलांचे रोपटे वाण म्हणून देण्यात आले.

कार्यक्रम स्थळी सौ. प्रियंका देशमाने व सौ.विद्या टाकणे यानी देवीची मूर्ती तयार करून आकर्षक सजावट केली होती व सर्व महिलांचे प्रमुख आकर्षण केंद्र बनली होती. सुबक आणि सुंदर रांगोळी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती त्यासाठी सौ.प्रियांका महेंद्रगीकर व कु. प्रज्ञा क्षीरसागर यांनी मेहनत घेतली कार्यक्रमाचे सूत्र संचालन सौ. पल्लवी व्यवहारे यांनी केले.

या कार्यक्रमासाठी सर्व महिला मंडळा कडून अतिशय नियोजन बद्ध व काटेकोर पणे कार्यक्रमाची आखणी करण्यात आली होती त्यामध्ये प्रामुख्याने सौ.अश्र्विनी लोखंडे,सौ.सारिका क्षीरसागर,सौ. अनुसया देशमाने,सौ.वर्षा चोपडे,सौ.सोनाली होकळे ,सौ.रोहिणी लोखंडे,सौ. सुनीता नाईक, ,सौ.अश्र्विनी धुमाळे, सौ. पूजा शेगांवकर, सौ.रेखा कलशेट्टी सौ.रागिणी लोखंडे सौ.वैशाली देशमाने, सौ. ज्योति फेसगाळे, सौ.उषा टाकणे, सौ.ज्योती गंगणे,सौ. दिपाली नवगिरे यांनी कार्यक्रम पार पाडला . याप्रसंगी समाजातील सर्व महिला आपल्या परिवारासह उत्साहाने उपस्थित होत्या.

## उत्पन्नच नसेल तर त्या करमाफीच काय करावं ? खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांची अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया



धाराशिव: बारा लाखापर्यंत उत्पन्न असणाऱ्याना आता करातून सूट मिळण्याची घोषणा करणाऱ्या सरकारने उत्पन्न वाढविण्यासाठी काय केल? उत्पन्नच नसेल त्यांनी करमाफीच काय करायच असा सवाल खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी उपस्थित केला. शेतकऱ्यांना समोर ठेवून कधीतरी धोरण ठरविणार आहात की नाही ? असाही प्रश्र्न ओमराजे यांनी मोदी सरकारला केला आहे.

खा. ओमराजे म्हणाले की, या सरकारचे आतापर्यंतचे सर्व अर्थसंकल्प हे आकड्याचे खेळ व घोषणाचा पाऊस एवढ्यापुरते मर्यादित आहेत. शेतकऱ्यांच उत्पन्न दुप्पट करु म्हणणार हे सरकार आता त्याविषयी एक चकार शब्द काढत नाही, शेतकऱ्यांना वीज, पाणी व हमीभाव या तीन गोष्टी आवश्यक असतात. धोरण करताना या तीनही बाबीत कमालीचा निरुत्साह दिसतो. असा धोरण लखवा असल्यावर त्या शेतकऱ्यांच उत्पन्न कस वाढणार ? शिवाय आता डाळीच्या उत्पादन वाढविण्यासाठी सरकार प्रयत्न करणार असं म्हणतंय पण पुन्हा मूळ मुद्दा येतो हमीभावाचा त्यावर अर्थमंत्री शब्दही काढत नाहीत.

सध्या शेतकरी कर्जबाजारी झाला आहे, तो अडचणीत आहे हे माहित असतानाही थोडीतरी संवेदनशिलता या सरकारने दाखवायला हवी होती. उद्योगपतीच लाखो कोटीच कर्ज माफ होत पण आमच्या कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांना लाखाची कर्जमाफी मिळत नाही हे दुर्देवी आहे. शेतकऱ्यांच जगणं हे सरकार कधीच मान्य करेल असं मला वाटत नाही अशी खंत ओमराजे निंबाळकर यांनी व्यक्त केली. आजही आपल्या देशाच्या आर्थिक विकासाचं लक्ष साडेसहा टक्केच्या पुढे जात नाही, ही आकडेवारी कोविड काळानंतरची सर्वात कमी आहे. यावरून या सरकारच धोरण व वास्तव परिस्थिती यामध्ये मोठं अंतर असल्याच अधोरेखित होत असल्याची प्रतिक्रीया खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी दिली आहे.

## केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ रोजगार निर्मितीसाठी उत्प्रेरक, इनोवेशन वरती ५०० कोटीची तरतूद

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगार निर्मितीला चालना देण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेवर भर देतो – भविष्यातील भारताच्या कार्यबलाला आकार देण्यासाठी महत्त्वाचे आधारस्तंभ. कौशल्यासाठी पाच राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्रांची स्थापना, आयआयटी पायाभूत सुविधांचा विस्तार आणि शिक्षणात एआयसाठी ५०० कोटी रुपयांचे वाटप यामुळे दर्जेदार शिक्षण आणि उद्योग–संबंधित प्रशिक्षणाची उपलब्धता लक्षणीयरीत्या वाढेल. याव्यतिरिक्त, स्टार्टअप्ससाठी १०,००० कोटी रुपयांचा नवीन निधी निधी, उत्पादन आणि नवोन्मेषात सतत गुंतवणूकीसह, रोजगार निर्मितीसाठी उत्प्रेरक म्हणून काम करेल, ज्यामुळे भारतातील तरुणांना नवीन आणि वैविध्यपूर्ण रोजगार संधी उपलब्ध होतील.

अटल टिंकरिंग लैब

सरकारी शाळांमध्ये ५०,००० अटल टिंकरिंग लॅब आणि ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटीची भर घालणे हे नवोपक्रमाच्या प्रवेशाचे लोकशाहीकरण करण्याच्या दिशेने एक पाऊल आहे, ज्यामुळे प्रत्येक मुलाला – पार्श्र्वभूमी काहीही असो – देशाच्या विकासात योगदान देण्याची संधी मिळेल.

नावीन्यपूर्णता आणि कौशल्य शिक्षण

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५–२६ हा एआय–चालित शिक्षण, संशोधन फेलोशिप, सखोल तंत्रज्ञान निधी आणि जागतिक कौशल्य भागीदारीसह योग्य दिशा ठरवतो, असे इंडियन स्कूल ऑफ हॉस्पिटॅलिटीचे सह–संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक कुणाल वासुदेव म्हणतात. शिक्षणाला आर्थिक शक्तीगृह म्हणून स्थान देण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल आहे. तथापि, धोरण नेहमीच प्रगतीपथावर असते – खरी परीक्षा अंमलबजावणीची असते. जर भारताला डिजिटायझेशनमध्ये शिक्षणात झेप घ्यायची असेल तर आपल्याला अंमलबजावणी, संस्थात्मक जबाबदारी आणि अनुकूलतेमध्ये १० पट मानसिकता आवश्यक आहे,

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मधील उपक्रम युवकांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी तयार करेल, तंत्रज्ञानात जागतिक नेता निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करतो. ५०० कोटी रुपयांच्या निधीतून तीन एआय सेंटर्स ऑफ एक्सलन्सची स्थापना संशोधन, नवोन्मेष आणि कौशल्य विकासाला चालना देईल, तर शैक्षणिक पायाभूत सुविधांसाठी वाढीव निधी भविष्यासाठी तयार असलेले कार्यबल तयार करेल.

**- प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड**

## मोदींचा मध्यमवर्गीयांपर्यंत पोहोचण्याचा मोठा प्रयत्न, खिशात अधिक पैंसे टाकण्यासाठी कर बदल

भारतातील मध्यमवर्गीय मतदारांकडून येणाऱ्या तक्रारींना उत्तर देताना मोदी सरकारने कर कपातीद्वारे मोठा धक्का दिला आहे.

– मोठी गोष्ट म्हणजे १२ लाख रुपये/वर्षापर्यंत उत्पन्न असलेल्यांना आता कोणताही आयकर भरावा लागणार नाही. या संदर्भात, लक्षात ठेवा की भारताचा सुमारे ८० टक्के भाग या वर्गात येतो.

– प्राप्तिकर स्लॅबवरील सवलतीच्या दरांमध्ये बदलांसह – जे बदलले गेले आहेत – ज्येष्ठ नागरिकांसाठी टीडीएस मर्यादेत बदल आणि भाडेपट्टा वाढवण्याच्या मर्यादेत वाढ, याचा अर्थ मध्यमवर्गीयांच्या खिशात अधिक पैसे येतील.

– गेल्या दशकात मध्यमवर्गीय हा मोदी सरकारचा मोठा समर्थक आहे परंतु अनेकदा त्यांना असे वाटले की गरीब आणि शेतकऱ्यांसारख्या इतर विशेष हितसंबंध गटांना थेट लाभ हस्तांतरणाच्या स्वरूपात वाढत्या फायद्यांमध्ये तो बाजूला पडला आहे आणि

– २०२५ मध्ये भारताच्या मध्यमवर्गासाठी मोदींचा मोठा राजकीय संदेश असा आहे: आम्हाला तुमची काळजी आहे आणि आता तुमच्या खिशात खर्च करण्यासाठी अधिक पैसे आहेत.

– भारतातील वापर मंदावला आहे, सणासुदीच्या काळात वाढ मंदावली आहे, जेव्हा व्हॉल्यूम ग्रोथ ३% ने मंदावला होता आणि किमती १–२% च्या दरम्यान होत्या.

– म्हणून, अर्थसंकल्पातील मोठी कल्पना म्हणजे तुमचे पैसे अधिक खर्च करून खर्च वाढवणे.

– सरकारने जाहीर केलेल्या कर कपातीमुळे, सुमारे १ लाख कोटी रुपये लोकांच्या खिशात जातील.

– एफएमसीजी स्टॉक्सवर यावर तात्काळ प्रतिक्रिया आल्या आहेत, त्यापैकी काही आयकर घोषणांनंतर लगेचच वाढले आहेत.

– त्यापलीकडे, १९९१ मध्ये आपण पाहिलेल्या मोठ्या धमाकेदार आर्थिक सुधारणांची अपेक्षा करणाऱ्यांना निराशा झाली आहे, अर्थव्यवस्थेचा उत्साह वाढवण्यासाठी मोठे बदल अपेक्षित आहेत.

– एकंदरीत, हे मध्यमवर्गीय मतदारांसाठी बजेट आहे, परंतु मोठ्या अर्थाने एक रूढीवादी बजेट आहे. भांडवली खर्च कमी झाला आहे आणि वित्तीय तूट ४.५% वर आली आहे, जागतिक वातावरणात जे प्रचंड आव्हानात्मक आणि विस्कळीत आहे, सरकारचे खातेदार 'आपण सावधगिरी बाळगूया आणि सुरक्षित राहूया. आपली शक्ती कोरडी ठेवूया' असे म्हणत असल्याचे दिसते. प्रश्र्न असा आहे की, कशासाठी?

– सरकारच्या स्वतःच्या मुख्य आर्थिक सल्लागारांनी आर्थिक सर्वेक्षणात असे संकेत दिले आहेत की नेहमीप्रमाणे व्यवसाय आता पुरेसा चांगला राहिलेला नाही परंतु अर्थ मंत्रालयाने सावधगिरी बाळगली आहे.

– एकंदरीत, अर्थसंकल्प सरकारला मध्यमवर्गाकडून आनंद मिळवण्यासाठी पुरेसे आहे, आणि भारतीय उद्योग आणि शेअर बाजारांकडून होणारी तक्रार ही एक जुगार आहे – ज्यांनी स्पष्टपणे प्रतिसाद दिला – सध्या तरी ते जोखीम पत्करण्यास योग्य आहे.

**लक्ष्मीकांत मनियार**
**(सी ए)**
**मनियार अट्टल एंड एसोसिएट्स, पुणे**

# भाजपच्या महिला मोर्च्या सरचिटणीस सौ.निर्मला कांबळे यांच्या वाढदिवसा निमित्त अण्णाभाऊ साठे विद्यालयात आरोग्य शिबीर संपन्न

लातुर-लातूर येथील साहित्यरत्न



अण्णाभाऊ साठे विद्यालयात भाजपा महिला मोर्चाच्या सरचिटणीस सौ.निर्मलाताई कांबळे यांच्या वाढदिवसा निमित्त आज दि १ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता आरोग्य शिबिर घेण्यात आले यावेळी नांदेड रोड परिसरातील नागरिकांनी या आरोग्याचे बिराचा लाभ घेतला.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला राजमाता जिजाऊ व शिक्षणाची मुहुर्त मेढ रवणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे भाजपा नेत्या डॉ. सौ.आर्चणाताई पाटील चाकुरकर,भाजपा जिल्हाध्यक्ष .देविदास काळे,भाजपा प्रवक्ता प्रेरणाताई होणराव,महिला मोर्चा अध्यक्षा सौ. रागीणीताई यादव,महिला मोर्चा सरचिटणीस सौ.रत्नमालाताई घोडके यांच्या हस्ते पुजन करून दिप प्रज्वलीत करीत शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी लातूर शहर पुर्व भागातील नागरीकांचे रक्त तपासणी व आयुष्यमान कार्डचे मोफत देण्यात आले.यावेळी भारतीय जनता पार्टी सरचिटणीस रविभय्या सुडे,दिग्वीजय काथवटे,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मंडल अध्यक्ष प्रमोद गुडे,सरचिटणीस सचिन मदने,पुर्व भाग कृती समितीचे अध्यक्ष दिपक गंगणे,बाबासाहेब बनसोडे,वसिमभय्या पटेल,आतिष कांबळे,संतोष तिवारी महिला मोर्चा सरचिटणीस शोभाताई कोंडेकर,मंडळ अध्यक्षा सौ.जयश्री भुतेकर,सुमनश्री राठोड,सुनिता उबाळे,निर्मला आलापुरे तसेच पुर्व भागातील जेष्ठ नागरिक महिला,पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते

# शरीरात ही तीन लक्षणे दिसू लागली तर खराब झाले आहे यकृत, अशा प्रकारे करा बचाव



पोटदुखी असो वा गॅसची समस्या, आपण ते हलक्यात घेतो, पण तसे करु नका. पोटात थोडाशी गडबड होणे देखील तुमचे यकृत खराब झाल्याचे लक्षण असू शकते. लिव्हर फेल्युअरची सुरुवात फॅटी लिव्हरपासून होते. आजकाल दारू न पिणाऱ्यांनाही हा त्रास होत आहे. ज्याला नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर म्हणतात. सर्वात सुरुवातीची लक्षणे म्हणजे तुम्हाला तुमच्या पोटाच्या उजव्या बाजूला वेदना होतात.

याशिवाय शरीरात अशी ३ लक्षणे आहेत, जी यकृत निकामी होण्याची सुरुवात असू शकतात. जर तुम्हालाही या समस्येचा सामना करावा लागत असेल, तर तो ओळखा आणि त्यावर त्वरित उपचार करा. यकृताच्या आजाराच्या बाबतीत प्रथम कोणती तीन लक्षणे दिसतात ते आम्ही तुम्हाला सांगतो.

या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका

१. अचानक वजन कमी होणे:

जर तुमचे वजन अचानक कमी होत असेल आणि पोटात दुखत असेल तर ही फॅटी लिव्हरची सुरुवातीची लक्षणे असू शकतात. या प्रकरणात, आपण त्वरित उपचार केले पाहिजे.

२. कावीळ

कावीळ हे यकृताच्या आजाराचे सर्वात म हत्त्वाचे लक्षण आहे. जर तुमचे डोळे, नखे पिवळी पडत असतील तर तुम्ही ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

३. त्वचेवर खाज सुटणे

त्वचेवर चार दिवसांपेक्षा जास्त काळ खाज येणे, हे देखील यकृताच्या आजाराचे लक्षण असू शकते. आपण त्याकडे दुर्लक्ष करू नये

या तज्ज्ञ स्पष्ट करतात की यकृताच्या आजारांवर उपचार देखील रुग्णाच्या स्थितीनुसार केले जातात. जर एखाद्याला आधीच मधुमेह, हृदयविकार असेल तर त्यासाठी डॉक्टर इतर औषधेही देतात, तरीही काही गोष्टींची काळजी घेतल्यास यकृताचा आजार सहज टाळता येतो. यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आहाराची काळजी घेणे. आहारात मैदा, मीठ आणि साखर कमी असल्यास यकृताचे आजार बऱ्याच प्रमाणात टाळता येतात. याशिवाय रोज काही व्यायाम करणे आवश्यक आहे, व्यायामाने वजन टिकून राहते.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. ०२ फेब्रुवारी २०२५ ते ०८ फेब्रुवारी २०२५

मेष : महत्त्वाचे निर्णय आज नकोत. कोणतेही महत्त्वाचे शुभकाम नको. प्रवास टाळावेत. वैवाहिक जीवनात मतभेदाची शक्यता आहे. आरोग्याकडे लक्ष हवे. घरात जर वृद्ध व्यक्ती असतील तर त्यांच्या आजाराकडे विशेष लक्ष द्यावे. प्रवास टाळावेत. खर्च वाढणार आहे.

वृषभ : आपल्या आर्थिक लाभामध्ये काहीही कमी पडणार नाही. शुभ कामे नकोत. शासकीय कामांत यश मिळेल. थोराम ोठ्यांचे सहकार्य मिळेल. व्यापारात व नोकरीत स्वास्थ्य राहील. आरोग्य चांगले राहील. सढळ हस्ते खर्च कराल. प्रियजनांसाठी खर्च कराल. सार्वजनिक कार्यात आपले श्रेष्ठत्व सिद्ध कराल.

मिथुन : मुलामुलींच्या दृष्टीने काही समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. शैक्षणिक व बौद्धिक क्षेत्रातील व्यक्तींना काही समस्या जाणवतील. कटाक्षाने कोणतीही शुभ कामे नकोत. म हत्त्वाचे निर्णय नकोत. शासकीय कामे नकोत. प्रवास टाळावेत. मानसिक अस्वस्थता राहील. आपल्या हातून शासकीय नियमांचे उल्लंघन होत नाही ना, याची दक्षता घ्यावी.

कर्क : प्रवासाचे योग येतील. वरिष्ठांकडे काही कामे असली तर वरिष्ठांची भीती न बाळगता आपली कामे नि:संकोचपणे सांगा, ती पूर्ण होण्याची दाट शक्यता आहे. प्रवासाचे योग येतील. आरोग्य उत्तम राहील. प्रवास सुखकर होतील. नोकरी-व्यवसायात प्रगतीचे वातावरण राहणार आहे.

सिंह : कोणतेही शुभ कार्य नको. प्रवास कटाक्षाने टाळावेत. शासकीय कामे नकोत. वरिष्ठांकडे कोणतेही प्रस्ताव घेऊन जाऊ नका. तडजोडीचे व सबुरीचे धोरण ठेवावयास हवे. व्यवसायात धाडस नको. नवीन जबाबदारी घेण्याचे शक्यतो टाळावे. प्रकृतीकडे विशेष लक्ष द्यावे. वरिष्ठ व वडिलधारी व्यक्तींकडून अपेक्षा नको.

कन्या : वास्तू, फ्लॅट, वाहनखरेदी इ. गोष्टी पुढे ढकलाव्यात. मानसिक अस्वास्थ्य वाटेल. व्यवसायात अडचणी आल्या तरीही आपल्या प्रामाणिकपणे वागण्याच्या स्वभावामुळे प्रगती होत राहील. आरोग्य चांगले राहील. पत्नीचा सल्ला फायदेशीर ठरेल. मुला-मुलींसंदर्भात एखादी समस्या निर्माण होईल.

तूळ : आपल्या बुद्धीकौशल्याचा उपयोग करून घ्याल. आपल्या बुद्धीला, अनुभवांना योग्य ती संधी मिळणार आहे. कामाचा ताण वाढणार आहे. जबाबदारी वाढणार आहे. काहींना मनाविरुद्ध प्रवास करावा लागणार आहे. अनेकांना मार्गदर्शन कराल. भावी आयुष्याच्या दृष्टीने एखादी चांगली बातमी समजेल. तडजोडीचे धोरण ठेवावे.

वृश्चिक : स्वभावात चिडचिडेपणा वाढणार आहे. त्यामुळे कौटुंबिक जीवनात व सहकाऱ्यांमध्ये वैचारिक दरी निर्माण होईल. महत्त्वाचे निर्णय कटाक्षाने टाळावेत. नवीन प्रकल्प तूर्त हातात घेऊ नका. स्वभावामध्ये कडकपणा व ताठरपणा निर्माण होईल.

धनु : कोणत्याही नवीन कामाचा विचार नको. कोणताही धोका पत्करू नये. धाडस शक्यतो टाळावे. वैवाहिक जीवनात मतभेद राहतील. संततीसुखही सामान्यच आहे.

मकर : एखादे साहस करण्याची उर्मी निर्माण होईल. साहस कटाक्षाने टाळावे. प्रवासही टाळावेत. वास्तू, फ्लॅट, बंगला या कामांमध्ये अडचणी येतील. आर्थिक प्रगतीमध्ये मात्र खंड पडणार नाही. शासकीय कामे नकोत. खर्च वाढतील. कौटुंबिक जीवनात मात्र चांगले वातावरण राहील.

कुंभ : आर्थिक क्षेत्रात धाडस टाळावे. वैवाहिक जीवनात मतभेदाची शक्यता आहे. उधारी वसूल होईल. आरोग्याकडे लक्ष हवे. संततीसौख्य लाभेल. काहींची अध्यात्मिक प्रगती होईल. मित्रांच्या आश्वासनांवर अवलंबून राहू नये. घरातील वृद्ध व्यक्तींकडे कटाक्षाने लक्ष द्यावे.

मीन : मित्र, सहकारी, वरिष्ठ ऐनवेळी तोंडघशी पाडतील. हितशत्रूंचा त्रास जाणवेल. मात्र, विरोधक आपले नुकसान करू शकणार नाहीत. भागीदारी व्यवसायात कटकटी वाढतील. सहकाऱ्यांची वागणूक पाहून आपण वैतागून जाल. काहीजणांच्या मनात निराशाजनक विचार येतील. वैवाहिक जीवनात मतभेद गंभीर होणार नाहीत याची काळजी घ्यावी.

## कसरत (बजेट )

तयार करणे बजेट
तारे वरची कसरत
कठीण ते सर्वांची
पुरी करणे हसरत

महागाईचा वणवा
आग चाले पसरत
बसले फटके चटके
काही नसे विसरत

एकदिवशी काम न
कार्य चाले अविरत
नफातोट्या विचार
प्रयास हो भगिरथ

सर्वांना हवीचं हवी
वाटे फक्त सवलत
देशाची वाढे कशी
सांग मग मिळकत

कर्तव्यकाय आपले
विचार का न करत
काय मिळाले मला
उगाच राहतो झुरत

देश राहे प्रगतीपथी
बदलाया हवी सुरत
सामान्यांच्याहातात
असते सुंदर सिरत

## महा बजेट..

जाहीर जाहलं बजेट
झेपावलं जोरात जेट
परिणाम होईलं काय
बाबा वॉच अन् वेट

मृगजळ काही जणां
कुणांचा फायदा थेट
जुनी दवा नाव नवे
बळीराजा अल्प भेट

मध्यमवर्गीय आनंदी
करसवलत मिळे भेट
सरकारची नवीन टर्म
मिळाली अनमोलभेट

छान चांगली सजली
मोठाली लिस्ट बकेट
खर्च आणि उत्पन्नाचा
जमणारं कसा समेट

आशा थोडीशीजीवंत
रे हिरवा अजूनि देठ
गरीब पुन्हा अर्ध पेट
गब्बर होणार ते शेठ

कोण जिंकेल स्पर्धा
कुणाची पडेलं विकेट
पाहू जरा वाट आता
धावू लागेल ट्रेन बुलेट

-- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

# शेतकऱ्यासह मध्यमवर्गीयांना दिलासा देणारा मोदीसरकारचा अर्थसंकल्प जाहीर-आ. कराड



लातूर- कृषी क्षेत्राला आत्मनिर्भर्तेकडे घेऊन जाण्यावर भर दिला असून क्रेडिट कार्डची मर्यादा तीन लाखाहून पाच लाखापर्यंत करण्याची घोषणा करून शेतकऱ्यांना त्याचबरोबर बारा लाखापर्यंतचे वार्षिक उत्पन्न करमुक्त करून मध्यमवर्गीयासह नोकरदारांना दिलासा देणारा पंतप्रधान नरेंद्रजी मोदी सरकारचा अर्थसंकल्प जाहीर झाला असल्याची प्रतिक्रिया भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी व्यक्त केली.

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील दुसरा अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीताराम यांनी आज शनिवारी संसदेच्या सभागृहात सादर केला यावर्षीच्या अर्थसंकल्पात त्यांनी शेती, उत्पादन, रोजगार, सूक्ष्म मध्यम आणि लघुउद्योग, ग्रामीण भागाचा विकास आणि संशोधन या दहा विशेष क्षेत्रावर भर दिला आहे.

कृषी क्षेत्र आत्मनिर्भर तिकडे घेऊन जाण्यासाठी पंतप्रधान धन्य कृषी योजनेचा देशभरातील १०० जिल्ह्यात १ कोटी ७० लक्ष शेतकऱ्यांना लाभ दिला जाणार आहे किसान क्रेडिट कार्ड वरील कर्जाची मर्यादा तीन लाखावरून पाच लाख करण्यात येत असल्याची घोषणा करून अर्थमंत्री निर्मला सीताराम यांनी तूर, उडीद, मसूर या डाळीच्या पिकांबरोबरच कापूस उत्पन्न वाढीसाठी आणि भाजीपाला व फळाचे विशेष उत्पादन वाढविण्यासाठी व किफायतशीर दर देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार असल्याचे बोलून दाखविले. शेतकऱ्यांसाठी हा दिलासा देणारा निर्णय आहे.

नवीन कर प्रणालीत फेरबदल करून १२ लाखापर्यंतचे वार्षिक उत्पन्न कर मुक्त करण्याचा निर्णय जाहीर करून मध्यमवर्गीयासह नोकरदारांना मोठा दिलासा दिला असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गोरगरिबांच्या हितासाठी अनेक योजना जाहीर केल्या वेगवेगळ्या क्षेत्रासाठी भरीव तरतूद केली, शिक्षण क्षेत्राला महत्त्व देऊन पुढील पाच वर्षात वैद्यकीय महाविद्यालयातील ७५ हजार जागा वाढवण्याचे घोषित केले. कर्करोग आजाराच्या रुग्णांसाठी दिलासा देऊन ३६ जीवनावश्यक औषधांना करातून सूट जाहीर केली.

महिलांना उद्योग वाढीसाठी प्रशिक्षण, मार्केटिंग आणि सरकारी योजनाशी जोडण्याची संधी दिली जाणार असून एससी आणि एसटीच्या पाच लाख नव्या महिला उद्योजकांसाठी दोन कोटी रुपये मुदतीचे कर्ज मिळणार आहे. एकूणच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीताराम यांनी देशहित आणि देशातील सर्वसामान्यांना डोळ्यासमोर ठेवून अर्थसंकल्प जाहीर केला खऱ्या अर्थाने सर्व क्षेत्राला निश्र्चितपणे दिलासा मिळणार असल्याचे आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

# संत गोपाळबुवा महाराज साखर कारखान्याचा ४ फेब्रुवारी रोजी बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा




लातूर - लातूर तालुक्यातील दिंडेगाव रोडवर मौजे रामेश्र्वर परिसरात शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करण्यासाठी उभा राहत असलेल्या संत श्री गोपाळबुवा महाराज शुगर अँन्ड ग्रो फुड इंडस्ट्रीज प्रा. लि. रामेश्र्वर या साखर कारखान्याचा बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा मंगळवार ४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता अध्यात्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या शुभ हस्ते करण्यात येणार असून या कार्यक्रमास कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यासह भागधारकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कारखान्याची चेअरमन राजेश कराड यांनी केले आहे.

लातूर ग्रामीण मतदार संघातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मागणीनुसार रामेश्र्वर परिसरात संत श्री गोपाळबुवा महाराज शुगर अँन्ड ग्रो फुड इंडस्ट्रीज प्रा. लि. रामेश्र्वर या साखर कारखान्याची उभारणी करण्यात आली असून या कारखान्याचा रोलर पूजनचा कार्यक्रम गेल्या १२ नोव्हेंबर रोजी परिसरातील हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहाच्या आणि स्वप्नपूर्तीच्या वातावरणात संपन्न झाला.

चालू हंगामात साखर कारखान्याचे गाळप सुरू व्हावे या दृष्टीने विविध अडचणीवर मात करत युद्धपातळीवर कारखान्याच्या उभारणीचे काम सुरू झाले असल्याचे सांगून चेअरमन राजेश कराड यांनी उभारणीस उशीर झाला असला तरी चालू गळीत हंगामाच्या अंतिम टप्प्यात प्रत्यक्ष गाळपाला सुरुवात होणार आहे. त्यानुसार येत्या ४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता कारखान्याचा बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा अध्यात्मिक क्षेत्रातील परमपूज्य विद्यानंद सागर महाराज गातेगाव, हभप नारायण महाराज उत्तरेश्र्वर पिंपरी, हभप लालासाहेब नाना पवार, हभप बाबा महाराज बोराडे आणि जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष नाथसिंह देशमुख यांच्यासह अनेक मान्यवरांच्या शुभहस्ते आयोजित करण्यात आला आहे.

श्री संत गोपाळ बुवा महाराज शुगर इंडस्ट्रीज या साखर कारखान्याच्या बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळ्यास कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आणि कारखान्याच्या भागधारकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कारखान्याचे मुख्य प्रवर्तक तुळशीराम अण्णा कराड आणि राजेश कराड यांनी केले आहे.

# लिंगभाव दृष्ट्या संवेदनशील प्रबुद्ध भारत हवा - डॉ. सुधीर मस्के




स्वारातीम विद्यापीठ,उप-परिसर, लातूर सामाजिक शास्त्र संकुलाच्या वतीने लिंगभाव संवेदनशीलता या विषयावर ३१ जानेवारी रोजी एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ह्या कार्यशाळेसाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील विद्यार्थी प्रत्यक्ष व ऑनलाईन उपस्थित होते. विविध सत्रांत संपन्नझालेल्या कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे सर यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी बोलताना ते म्हणाले, लिंगभाव संवेदनशीलता , लैंगिक न्याय आणि लैंगिक समानतेच्या मुद्द्यांसाठी संवेदनशील पद्धतीने वागण्याची जागरूकता एक सूचितप्रवृत्ती म्हणून पाहिले जाऊ शकते. लिंगभावाबद्दलचे शिक्षण-प्रशिक्षण आणि जागरुकता वाढविण्याच्यादृष्टीने ही कार्यशाळा महत्वाची ठरत आहे. संपन्न झालेल्या विविधसत्रांपैकी एका सत्रात 'युवकांची लिंगभावन्यायाबद्दल समज, भूमिका व क्षमताबांधणी या विषयावर मत व्यक्त करताना दीपा पवार म्हणाल्या की, स्त्री अभिव्यक्ती, मानवता आणि सामाजिक क्षेत्रांमधील हा विषय अतिशय महत्वाचा आहे. लैंगिक संवेदीकरणा सोबतच हा राजकीय आर्थिक सामाजिक सत्तेच्या हस्तांतरणाचा विषय आहे, आज सबलीकरणाचे अर्थ आपण कसे रचले ते समजून घेत त्याला बदलण्याची गरज आहे. सोबतच इतिहासातील स्त्रियांची भूमिका जाणून स्त्री प्रश्र्नच आपलं आकलन अधिक व्यापक आणि एकसत्वीकरण करणार नसावं. विषमतेचे स्तर आपण समजून घेतले पाहिजेत. लिंग समानता आणि न्याय इ.साठी अधिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. समकालीन स्त्री प्रश्र्नावर प्रकाश टाकत संविधान हे स्त्रीवादी असल्याचे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. दिल्ली विद्यापीठ,दिल्ली येथील डॉ. सुधीर मस्के यांनी दलितमहिलांची आत्मकथने व लिंगभाव संवेदनशीलता या विषयावर आपले मत व्यक्त करताना,आज संवेदनशीलता शिकवण्याची गरज असून त्याबद्दलस्पष्ट आणि अचूक दृष्टीकोन विकसित केला पाहिजेत तसेच लैंगिक समानतेच्या चिंतेबद्दल जागरुकता निर्माण करून दृष्टीकोन बदलण्याची गरज आहे. आज विकसित भारत तेव्हाच शक्य होईल जेव्हा तो लिंगभाव दृष्ट्या संवेदनशील प्रबुद्ध भारत होईल तसा भारत निर्माण होण्याची आवश्यकता आहे. यासाठी शिक्षण व्यवस्थेमधून लिंगभाव विषयक विचारांची रुजवणूक होणे गरजेचे आहे. याप्रसंगी डॉ. अंजली जोशी यांनी जेंडर गॅप आणि सक्षमीकरणापुढील आव्हाने,लोकप्रिय माध्यमातून उत्पादित होणारी लिंगभाव विषमता, त्या सर्वांवर कशा प्रकारे उपाय योजावे यावर आपले मत प्रस्तुत केले तर प्रा. अनिता गायकवाड यांनी कामाच्या ठिकाणी लिंगभाव संवेदीकरणाचे महत्व प्रस्तुत करत असताना याविषयावर सकारात्मक दृष्टीने प्रत्यक्ष कार्य करण्याची गरज आहे. हा विचार मांडला. प्रा. डॉ.अशोक नारनवरे यांच्या वक्तृत्वात पशु ते माणूस इथपर्यंतचा प्रवास व्यक्त करीत असताना ऐतिहासिकस्त्री चरित्रे व त्यांच्यावरील झालेल्या अन्याय-अत्याचारावर प्रकाश टाकला. तर समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. एस. पी. घायाळ यांनी बाईपण म्हणजे शोषण प्रक्रियेचाएक भाग असून यासाठी लिंगभाव संवेदनशीलता एक प्रशिक्षण जाणीव आहे, असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगीस्वारातीम विद्यापीठ उप-परिसर, लातूरचे संचालक डॉ. राजेश शिंदे यांनी पी. एम. उषा अंतर्गत आयोजित कार्यशाळेची एकूण पार्शवभूमी, संकल्पना स्पष्ट करताना म्हणाले की, आज बदलत्या समाजातील संपूर्ण व्यवस्था तंत्रज्ञान विज्ञान बदलेली आहे. यासाठी युवापिढीने ही बदलणं महत्वाचं असून स्त्री-पुरुष यांच्यात मित्रत्वाच्या भूमिकेतून सुसंवाद साधणे महत्वाचं आहे. या कार्यशाळेत लिंग संवेदीकरण या संकल्पने सोबतच लिंगभूमिका, विशेषाधिकार, लिंग भेदभाव आणि लिंग जागरुकता अशा अनेक पैलूंवर सकारात्मक चर्चा झाल्याने, सदर कार्यशाळा महाविद्यालयीन विद्यार्थी-विदयार्थीनी, प्राध्यापक व संशोधकांसाठी अतिशय महत्वपूर्ण ठरली. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. एस. एस.कोंडेकर , डॉ. एस. एच. कडेकर यांचे मार्गदर्शन लाभले. प्रास्ताविक व आभार समाजशास्त्र विभाग प्रमुख व कार्यशाळा समन्वयक डॉ. अनिल जायभाये यांनी मांडले तर सुत्रसंचालन प्रा. पंचशील डावकर यांनी केले. संकुलातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या सहकार्याने ही कार्यशाळा यशस्वीरित्या संपन्न झाली.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894